# समुद्री डाकु आणि घंटा



लेखक : एलेनोर

मराठी : अश्विनी बर्वे



# समुद्री डाकु आणि घंटा



# खतरा

कॅलिफ़ोर्नियाच्या समुद्री तटाच्या
जवळ समुद्री डाकू दिसले
होते. त्याजवळ एक मिशन होते.
सॅन जुआन कॅपिस्ट्रॉनचे पाद्री
आणि तेथील स्थानिय इंडियन या
बातमीमुळे चिंतेत होते.
“ते आपल्या मिशनवर हल्ला
करतील?” पिओने आपल्या
वडिलांना विचारले.
“जर ते सैतान इथे आले तर,”
पिओचे वडील म्हणाले, “मी त्यांची
माझ्या हातोडीने पिटाई करेन.”

“जर समुद्री चोर इथे आले,” पिओची आई म्हणाली, “मग आपण डोंगरावर आजीच्या घरी राह्यला जावू.” “पण मी इथेच राहीन,” पिओ म्हणाला.

“आणि समुद्री डाकू बरोबर आपल्या धनुष्यबाणाने लढेन.”

“बाला त्यासाठी तू अजून लहान आहे.” आई म्हणाली.

मग पिओ उठून उभा राहिला.

“आता मी सशांची शिकार करू शकतो.” त्याने अभिमानाने सांगितले. पण आईने त्याच्याकडे तीक्र्या नजरेने पाहिले.

“चल, लवकर जा,” आई म्हणाली.

“नाहीतर शाळेत पोहचायला उशिर होईल.”





पिओ शहरातल्या चौकापर्यंत गेला.वडील खुर्ची बनवतांना, कातड्या पासून चामडं बनवतांना, आणि मेणबत्ती आणि साबण बनवतांना, त्यांच्याकडे बघायला त्याला खूप आवडे.

त्याला आवडे, कुंभार जेव्हा चाकावर मातीची भांडी तयार करे, चांभार चप्पल करे आणि स्त्रिया जेव्हा विणत आणि दोन पहारेकरी जेव्हा आपली बंदुक पॉलिश करत तेव्हा हे सगळं बघायला याला आवडे.

पिओला सगळ्यात जास्त आवडे चर्चची घंटा.



चर्चची घंटा सकाळी उठण्याची वेळ लोकांना सांगत असे. त्यांना प्रार्थना, जेवण आणि काम, झोपण्याची वेळ सांगत असे. त्या घंटेची जादूच वेगळी होती. घंटेला संतांची नावं दिली होती.

सॅन विनस्त यांच्या नावाची घंटा सगळ्यात मोठी होती. तिचा आकार राजाच्या मुकुटा सारखा होता. तिचा सगळ्यात गोड आवाज होता, हॅलो, सॅन विनस्त," पिओ म्हणायचा, "माझ्यासाठी सगळ्यात विशेष घंटा आहे."

त्याचवेळी म्हातारा कार्लोस घंटा वाजवण्यासाठी बागेत आला.
“एक दिवस तू सॅन विनस्त ची घंटा वाजवशील.” म्हाताऱ्या कार्लोस प्रेमाने म्हणाला. “ये मी ती कशी वाजवायची हे शिकवतो. जर तू दोरी नीट ओढली तरच घंटेतून खरा आणि खोल गंभीर आवाज येईल. नाहीतर गाईच्या गळ्यात बांधलेल्या घंटे सारखा आवाज येईल. जेव्हा पिओने दोरी पकडली तेव्हा त्याला खूप छान वाटलं. “हे काय चालू आहे?” कोणीतरी मोठ्या आवाजात म्हटलं.





पाद्री बरोनाने पिओच्या हातातून दोरी घेतली.

“तुला शाळेला उशिर होत आहे बघ,” ते म्हणाले.

“मला माफ करा पाद्री,” पिओ म्हणाला. “पण समुद्री डाकू येतील असा अंदाज आहे म्हणून मी सॅन विन्स्टची घंटा वाजवायला शिकत आहे.” पाद्री बरोनाने पिओ कडे रोखून पाहिलं. “ही घंटा वाजवणे हा एक मोठा सन्मान आहे, घंटा वाजवण्यासाठी तुला काही चांगलं काम करावं लागेल.” पिओ एक क्षण विचार करू लागला. “मी त्यासाठी काय करू शकतो,” पिओने विचारले. पाद्री बरोना यांनी स्मित केलं, “आधी तू शाळेत वेळेवर जायला शिक.”

# पिओ संकटात सापडला



वर्गात आधीच सारी मुले आपल्या जागेवर बसले होते. पिओ चुपचाप आपल्या जागेवर जाऊन बसला. धडा काहीसा कठीण होता, म्हणून जेव्हा गाण्याचा तास आला तेव्हा पिओ खुश झाला. मुलांनी ढोलकी आणि ड्रम वाजवला. त्यांनी गिटार आणि बासरी वाजवली. पिओने वाळलेल्या भोपळ्याचा खुळखुळा वाजवला. आज तो समुद्री डाकू आणि घंटेच्या बाबत विचार करत होता. त्यामुळे तो गाणं विसरला होता.

“तुझ्या गाण्याला ना सुरुवात आहे ना शेवट,” संगीत शिकवणारे पाद्री म्हणाले, “तू परत प्रयत्न कर.” काही वेळाने त्यांना सॅन अॅटानिओची घंटा ऐकू आली. टण टण टण. आता दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. “पिओ, टीचर म्हणाल्या. “कारण की तू आज उशिरा आला म्हणून तू आज सफाई कर,” जेव्हा सफाई झाली तेव्हा खाण्याची वेळ संपली होती. तो भुकेला होता.जेव्हा तो चौकाकडे पळत गेला तेव्हा तो दरवाजा बंद करायला विसरला.



तो घरी आई-वडिलांजवळ बसला. सगळ्यांनी आधी प्रार्थना केली, मग ते जेवले.

“व्वा! डाळ आणि भाज्यांचे सूप खूप रुचकर झाले आहे.” पिओच्या आईने स्वयंपाक केला होता.



पिओने सुद्धा एक टोर्टीआ (पोळी) आणि भाजी खाल्ली.

अचानक पिओच्या लक्षात आलं की, तो शाळेतला त्याच्या वर्गाचा दरवाजा बंद करायचा विसरला आहे. मग तो जोरात पळत शाळेत गेला, पण तोपर्यंत उशिर झाला होता.



कोंबड्या वर्गात घुसल्या होत्या.त्यांनी शाईच्या दौती उलट्या केला होत्या आणि सगळीकडे निळी शाई पसरली होती. सारखी काही ना काही गडबड होत होती. कदाचित पिओला कधीच घंटा वाजवण्याची संधी मिळणार नाही.

तेव्हाच टण टण टण करून सॅन ॲटिओची घंटा वाजली. आता दुपारची कामं करण्याची वेळ होती. पिओ बाहेर मेंढ्या चरायला घेवून गेला.

# समुद्री डाकू

तेव्हाच अचानक पिओने घोड्यावर स्वार एक माणसाला शेतातून पळत जातांना पाहिलं. तो माणूस काहीतरी ओरडत होता. जवळ आल्यावर त्याने ऐकलं, “समुद्री डाकू येत आहे!”



पिओ, डोंगरावर चढला, मधून मधून तो समुद्राकडे निरखून पाहत होता. त्या समुद्री चोरांचं एखादं जहाज असेल का?

मग पिओ मेंढ्याच्या बाबत पार विसरून गेला. जोरात पळण्यासाठी त्याने आपल्या दोन्ही तळव्यांना कोरडी मातीने रगडले, मग तो जोरात पळू लागला.

***सॅन विनस्तची घंटा जोरात वाजू लागली. टण टण टण सगळ्या लोकांनी लवकर चर्च मध्ये या.***



"समुद्री डाकूचे जहाज अजून दोन दिवस दूर आहे," घोडेस्वाराने सांगितले.

हे ऐकून पिओला खात्री पटली की, खरच समुद्री डाकू येत आहे.

“चला सगळ्यांनी मिळून प्रार्थना करू की सैनिक लवकर यावे म्हणून,” पाद्री बरोना म्हणाले. “पण जर समुद्री डाकू आधी आले तर आपण काय करायचे?” पिओच्या आईने विचारले. “घाबरु नका.”पाद्री बरोना म्हणाले, “उद्या आपण पहाडावर एका सुरक्षित ठिकाणी जावू.”

"आज रात्री आपण आपलं खाणं बांधून घेवू आणि आपल्या मूल्यवान गोष्टी लपवून ठेवू.” मग समुद्री डाकुंना लुटण्यासाठी इथे काहीच मिळणार नाही.“ “मग समुद्री डाकूंची चांगली मजा होईल,” पिओ म्हणाला.





रात्रीच्या जेवणानंतर चौकात शेकोटी पेटवली. मग स्त्री-पुरुष, मुलं-मुलींनी मिळून जुनी गाणी म्हटली. मग त्यांनी मेणबत्त्या, साबण, लोकर, कांबळे, चपला, आणि खाण्याचे पदार्थ पॅक केले..

पाद्री बरोनाने काळजीपूर्वक चांदीचे मेणबत्ती स्टॅन्ड आणि देवीची मूर्ती एका कपड्यात बांधली. पाद्रीने त्या वस्तू एका बागेच्या कोपऱ्यात माती खाली लपवून ठेवल्या.

म्हाताऱ्या कार्लोसने आता झोपण्याची घंटा वाजवली. पिओचे आई-वडील मिशनच्या बाहेर आपल्या घरी गेले. पिओ मिशन मध्येच इतर मुलांबरोबर राहिला. पण त्याला चांगली झोप आली नाही. त्याला समुद्री डाकुंचे स्वप्न पडत होते. ते लांब तलवार घेवून त्याचा पाठलाग करत होते. सॅन विसंन्तच्या घंटेने त्याला जागं केलं तेव्हा त्याला आनंद झाला. टण टण टण.



गुड-मॉर्निंग! घंटी म्हणाली. चला आता सकाळच्या प्रार्थनेची वेळ झाली.

# पिओ गायब झाला



नाष्टा झाल्यानंतर पिओने सगळ्या जनावरांना एकत्र केलं.

तो त्यांना हाकलत डोंगरावर घेवून गेला. लोक इकडेतिकडे काम करत होते. काहीजण आपल्या बैलांवर सामान लादत होते. “आपण आपल्या बरोबर सगळं खाणं घेवून जावू शकणार नाही,” पाद्री बरोना म्हणाले. “बाकी जेवण घेवून जाण्यासाठी आपण परत उद्या येवू.” पिओ पाद्री बरोना यांच्याबरोबर चालत होता. “आज रात्री जर समुद्री डाकू आले तर सॅन विनस्तची घंटा कोण वाजवेल?” पाद्रीने पिओच्या खांद्यावर थोपटले, “ते इतक्या लवकर नाही येणार,” ते म्हणाले.

पिओला पाद्रींनी सांगितलेलं पटलं नाही. त्याला रात्रीचं स्वप्नं अगदी खरं वाटत होतं. लवकरच पाद्री आणि स्थानिक लोक, बैल आणि जनावरांची मोठी रांग पहाडावर चढू लागली.

“पिओ कुठे आहे?” आईने विचारलं. “तो कदाचित आपल्या मित्रांबरोबर असेल,” पिओचे वडील म्हणाले.



पण खरंतर पिओ तिथे नव्हता. आई-वडिलांनी त्याला सगळीकडे शोधलं. पण कोणीही पिओला बघितलं नव्हतं. पिओ जुन्या दगडी पडक्या चर्च मध्ये लपला होता. तो हे विसरून गेला होता की, त्याचे आईवडील त्याची काळजी करत असतील. यावेळी तो समुद्री डाकूच्या बाबतच विचार करत होता. अंधार झाल्यावर पिओ चौकात आला.





तिथं सैनिक सराव करत होते.
पिओ त्यांना बघून हसला. त्याने
एकूण तीस सैनिक मोजले. त्यांच्या
बरोबर दोन पहारेकरी सुद्धा होते.
म्हणजे एकूण ३२ सैनिक झाले.
“इतकेजण समुद्री डाकुंना
घाबरवण्यासाठी पुष्कळ झाले,“
त्याने विचार केला.

पिओने काही सफरचंदे घेतली
आणि आपल्या धनुष्यासहित
समुद्राच्या तटावर पळत गेला.
त्याला सगळ्यात आधी समुद्री
डाकुंचे जहाज बघायचे होते.




हळूहळू अंधार पडू लागला आणि आकाशात चंद्र चमकू लागला. पिओ ताऱ्यांच्या छत्रीखाली गाणं गुणगुणू लागला. त्याला जेवढी गाणी येत होती तेवढी गाणी त्याने गायली. तरीपण तो जागा राहू शकला नाही.

सकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटाने त्याला जाग आली. त्याने समुद्राकडे निरखून पाहिलं. त्याने आपले डोळे चोळले आणि परत बघितलं.

समुद्री डाकुचे जहाज़ समोर उभे होते. डाकू छोट्या नावेमधून किनाऱ्याकडे येत होते. पिओ ही बातमी सैनिकांना देण्यासाठी पळाला.



"समुद्री डाकू येत आहे”
तो ओरडला. सैनिकांचा
अधिकारी लगेच घोड्यावर
बसून डाकूना बघण्यासाठी
पळाला.

अफसर ने हामी भरी अधिकाऱ्याने हमी दिली,
“शंभर पेक्षा अधिक समुद्री डाकू आहेत,”
तो म्हणाला. “तू पण पहाडावर जावून लप.
आम्ही इथून मागे जातो, नाहीतर मारले
जावू.”



परत येवून त्याने सांगितले की,”
इथून आपल्याला थोडं मागे जावं
लागेल.” पिओला हे बरोबर वाटलं नाही.
“तुम्ही लोक इथून पळून जात आहात?”
पिओने विचारले.

# पिओने घंटा वाजवली



मग पिओ पळाला, त्याला घंटेची आठवण आली. तो लोकांना जागं करणार होता. तो चर्चच्या बागेत धावत गेला. त्याने पूर्ण दम लावून सॅन विन्संतची घंटा वाजवली. टण टण टण.

पहाडावरच्या सगळ्या लोकांनी घंटेचा आवाज ऐकला. “ही घंटा पिओने वाजवली असणार,” म्हातारा कार्लोस म्हणाला. “आपल्या चर्चला धोका आहे.” पिओची आई रडू लागली, “माझा बिचारा मुलगा,” ती रडत म्हणाली.

घंटा वाजवल्यावर पिओ जवळच्या डोंगरावर गेला. त्याने काही समुद्री डाकुंना चर्च मध्ये घुसतांना पाहिलं.

पण त्याने आपल्या मागे येणाऱ्या डाकुला पाहिलं नव्हतं. त्या डाकूने पिओला पकडलं. आणि खेचून त्याला त्यांच्या प्रमुखा जवळ घेवून आला.



"जनरल बूचार्ड," डाकू म्हणाला. “बघा मी कोणाला पकडून आणलं आहे.” “अरे व्वा! जनरल म्हणाला. “तू आमच्याशी तुझ्या या धनुष्यबाणाने लढणार का?” पिओने त्या मोठ्या राक्षसाकडे पाहिलं. त्याने लाल आणि काळ्या रंगाचे कपडे घातले होते. पिओचे पाय कापू लागले. पण त्याने धैर्याने काम केले. त्याने आपलं डोकं हलवलं. “त्याची मान कापून टाका,” समुद्री डाकू ओरडला.



पिओने स्वतःला सोडवण्याचा खूप प्रयत्न केला.

जनरल बोचार्ड हसला. “त्याला जाऊ द्या.”तो म्हणाला. पिओ जोरात पळत गेला.पुढे सुरक्षित अंतर कापल्यावर पिओ एका झाडावर चढला. मग त्याने मागे वळून पाहिलं.

“खाणं! इथं तर बिलकुल ताजं अन्न आहे.”

सारे समुद्री डाकू ओरडले. मग कोणी रागाने ओरडले. “ते सगळं आपल्या बरोबर घेवून गेले. चला ही जागा जाळून टाकू या.”



धुराचे काळे ढग हवेत वर गेले.
हवा में ऊपर उठा. पिओने रात्र होण्याची
वाट पाहिली. मग तो परत आला.



मग डाकुनी काही घरांना आग लावली.
पण चर्च सुरक्षित होतं. तीन दिवस
पिओ हे सगळं बघत होता. तो बोरं
आणि कंदमुळे घाऊन जिवंत राहिला.
मध्ये मध्ये तो थोड्यावेळ झोपला.
शेवटी डाकू आपल्या जहाजावर
निघून गेले.



मग पिओने परत सॅन विन्स्टची घंटा वाजवली. टण टण टण चर्चमध्ये परत या. पिओने परत परत घंटा वाजवून तो संदेश दिला.

मग दुपारी पाद्री आणि स्थानिक लोक परत आपल्या घरी आले. पिओ आपल्या आईवडिलांना पाहून खूप खुश झाला. तो सरळ आपल्या आईकडे धावत गेला आणि तिला बिलगला.



“पिओ!" वडिलांनी जोरात हाक मारली.

“तू तर आम्हांला घाबरवलंस.” पण त्यांनी आपल्या पिओला जवळ घेतलं. “तू आता बहादुरी दाखवण्याइतका मोठा झाला,” आई म्हणाली. हे ऐकून पिओचे डोळे चमकू लागले. “आता मी सॅन विन्स्टची घंटा वाजवू शकतो का?” पिओने बरोना यांना विचारलं.पाद्री हसले, “तू ते मिळवलं आहेस,” ते म्हणाले. मग पिओ पळत-पळत ही बातमी सॅन विन्स्टला सांगायला गेला.



समाप्त